महाराष्ट्र शासन

**विभागीय शिक्षण उपसंचालक,**
पुणे विभाग पुणे-१ यांचे कार्यालय,
१७, डॉ.आंबेडकर मार्ग, लालदेवळासमोर, पुणे-४११ ००१

Phone : (020) 26125696
Fax : (020) 26122217
w'site : www.dydepune.co.in
e-mail : dydpune@gmail.com

**शालेय शिक्षण विभाग**

जा.क्र.शिऊसं/आस्था-१०१/असुप/पदोन्नती/पुवि/२०२५/1374558
दिनांक :- 14 AUG 2025

**आदेश :-**

सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय दिनांक ०७ मे २०२१ मधील निर्देशानुसार सेवाजेष्ठता व अनुषंगिक निकष लक्षात घेऊन निवड समितीने केलेल्या शिफारशीनुसार खालील नमूद गट-क मधील कर्मचा-यांची तात्पुरती पदोन्नतीसाठी निवड करण्यात येऊन त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या पदावर व कार्यालयात पदस्थापना देण्यात येत आहे. सदर कर्मचा-यांच्या पदोन्नत्या निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात खुल्या प्रवर्गामधून देण्यात येत आहे.

| अ.क्र. | कर्मचा-यांचे नांव व सध्याचे कार्यालय | पदोन्नतीचे पद व कार्यालय |
|---|---|---|
| | **मुख्य लिपिक** | |
| १ | श्री. एस. जी. तळेकर<br>वरिष्ठ लिपिक<br>वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक (माध्यमिक) पुणे | मुख्य लिपिक<br>विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग पुणे येथे रिक्त पदावर |
| २ | श्री. के. बी. शिंदे<br>वरिष्ठ लिपिक<br>विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे | मुख्य लिपिक<br>लेखाधिकारी, लेखा तपासणी पथक, (शिक्षण) अहिल्यानगर येथे रिक्त पदावर |
| ३ | श्री. आर. एच. शेख<br>वरिष्ठ लिपिक<br>वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक (माध्यमिक), अहिल्यानगर | मुख्य लिपिक<br>वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक (माध्यमिक), अहिल्यानगर येथे रिक्त पदावर |
| | **वरिष्ठ लिपीक** | |
| १ | श्रीम. एफ. एम. खान<br>कनिष्ठ लिपिक<br>वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक (प्राथमिक), अहिल्यानगर | वरिष्ठ लिपिक<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, अहिल्यानगर येथे रिक्त पदावर |
| २ | श्री. ए. एस. पिसे<br>कनिष्ठ लिपिक<br>शिक्षणाधिकारी (योजना), जिल्हा परिषद, सोलापुर | वरिष्ठ लिपिक<br>शिक्षणाधिकारी (योजना), जिल्हा परिषद, सोलापुर येथे रिक्त पदावर |
| ३ | श्री. पी. एस. इलग<br>कनिष्ठ लिपिक<br>पीठासीन अधिकारी, शाळा न्यायाधिकरण, पुणे विभाग पुणे | वरिष्ठ लिपिक<br>विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे येथे रिक्त पदावर |

Scanned with OKEN Scanner

| | | |
|---|---|---|
| ४ | श्री. ए. एस. तांबे<br>कनिष्ठ लिपिक<br>शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे | वरिष्ठ लिपिक<br>वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक (माध्यमिक),<br>पुणे येथे रिक्त पदावर |
| ५ | श्री. डी. डी. दडस<br>कनिष्ठ लिपिक<br>शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे | वरिष्ठ लिपिक<br>वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक (माध्यमिक),<br>सोलापुर येथे रिक्त पदावर |

सदरच्या पदोन्नत्या हया खालील अटींचा व शर्तीच्या अधीन राहून करण्यात येत आहेत.

१. मा. उच्च न्यायालय मुंबई यांनी याचिका क्रमांका ३७९७/२०१५ मध्ये दि. ०४.०८.२०१७ रोजी दिलेल्या निर्णयान्वये पदोन्नतीमधील आरक्षण अवैध ठरविले आहे. मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या विरोधात राज्य शासनाने मा. सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुज्ञा याचिका क्र. २८३०६/२०१७ दाखल केली आहे. सदर याचिका अद्याप प्रलंबित आहे.

२. उक्त नमूद सर्व संवर्गातील पदोन्नती ही मा. सर्वोच्च न्यायालयातील विशेष अनुज्ञा याचिका क्र. २८३०६/२०१७ च्या निर्णयाच्या अधीन राहून तसेच शासन निर्णय दिनांक ०७.०५.२०२१ मधील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे. तसेच सदर आदेशान्वये पदोन्नतीचे आदेश बाधीत झाल्यास त्या आदेशान्वये पदोन्नत झालेल्या कर्मचा-यांना सेवाजेष्ठता व तदनुषंगिक आर्थिक लाभ मागण्याचा हक्क राहणार नाही.

३. शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक पीएवाय/१०८२/सीआर/११००/(१) एसईआर, दिनांक ०६.११.१९८४ व तदनंतर शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार पदोन्नत होणा-या कर्मचा-यांनी पदोन्नत पदावर रुजू झालेल्या दिनांकापासून एक महिन्याच्या आंत वेतननिश्चितीसाठी विकल्प संबंधित कार्यालय प्रमुखाकडे द्यावयाचा आहे. विहित मुदतीत विकल्प न दिल्यास, त्याची वेतननिश्चिती सरळ महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ च्या नियम ११ (१) (अ) नुसार करण्यात येईल.

४. संबंधितांनी पदोन्नत झालेल्या कर्मचा-याना त्यांच्या पदोन्नतीच्या पदावर रुजू होण्यासाठी त्वरीत कार्यमुक्त करावे. तसेच कार्यमुक्त केल्याचा व पदोन्नतीच्या पदावर रुजू करुन घेतल्याचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

५. संबंधित कर्मचा-यांनी पदोन्नती आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आंत पदोन्नतीच्या पदावर रुजू व्हावे.

Digitally signed by
Ganpat Shankarrao More
Date: 14-08-2025
14:56: **(डॉ. गणपत मोरे)**
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग पुणे- १

प्रति,

**संबंधित कर्मचारी**

प्रत माहिती व कार्यवाहीसाठी रवाना

१. मा. पीठासीन अधिकारी, शाळा न्यायाधिकरण, पुणे विभाग, पुणे.
२. शिक्षणाधिकारी (योजना) जिल्हा परिषद, कार्यालय सोलापुर
३. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, कार्यालय अहिल्यानगर
४. शिक्षणाधिकारी, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक (माध्यमिक) अहिल्यानगर, पुणे, सोलापुर
५. शिक्षणाधिकारी, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक (प्राथमिक) अहिल्यानगर
६. लेखाधिकारी, लेखा तपासणी पथक, (शिक्षण), अहिल्यानगर

प्रत- आस्थापना/ लेखा शाखा प्रस्तुत कार्यालय

Scanned with OKEN Scanner